**ठळक बातम्या**

- पदपथावरुन चालणं हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

- प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना ही देशातल्या तरुणांच्या क्षमतांचं संधीत रुपांतर करेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- लढाऊ विमानं, क्षेपणास्त्र आणि इतर संरक्षण सामुग्रीसाठी आवश्यक असलेल्या हलक्या ॲल्युमिनियम निर्मिती प्रकल्पाची संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते पायाभरणी

आणि

- ६० व्या वर्धापन दिनानिमित्त दोन्ही शिवसेनेचे मुंबईत मेळावे

<><><><><>

चिन्हांकित पदपथावरून चालण्याचा अधिकार हा एक मूलभूत अधिकार असल्याचा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने आज दिला. मोटार वाहनांच्या वाहतुकीपेक्षा चिन्हांकित पदपथावरून चालण्याच्या नागरिकांच्या अधिकाराला अधिक प्राधान्य दिलं जावं, असं न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि ए. एस. चांदुरकर यांच्या पीठाने स्पष्ट केलं. एका रस्ते अपघातासंबंधी नुकसानभरपाईच्या खटल्यावर सुनावणी करताना न्यायालयानं सांगितलं की, हा अधिकार राज्यघटनेच्या कलम १९ (1)ड अन्वये मिळणाऱ्या मुक्त संचाराच्या अधिकाराचा आणि कलम २१ अन्वये जीवन आणि स्वातंत्र्यासह इतर मूलभूत अधिकारांचाच भाग आहे. त्यामुळे रस्त्यालगत पादचाऱ्यांसाठी चिन्हांकित आणि सुस्थितीत असलेले पदपथ उपलब्ध करून देणं हे संबंधित यंत्रणांचं कर्तव्य आहे, असंही न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना ही देशातल्या तरुणांच्या क्षमतांचं संधीत रुपांतर करेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत २ हजार ४०० कोटी रुपयांच्या प्रोत्साहन निधीचं वितरण आज त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी बोलत होते. ही भारतातील तरुणांना सक्षम करण्याच्या आणि रोजगारावर

आधारित विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या योजनेच्या आतापर्यंतच्या यशाबद्दल प्रधानमंत्री म्हणाले..

**होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री**

प्रथमच नोकरीवर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन देणं आणि संबंधित कर्मचाऱ्यांना रोजगार देणाऱ्या औद्योगिक संस्थांनाही प्रोत्साहनपर अनुदान देणं, अशा दोन भागात ही योजना राबवली जाणार आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या यशात स्वदेशी उपकरणांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याचप्रमाणे ही ॲल्युमिनियम एक्सट्रुजन प्रेस देशाला संरक्षण प्रणालीसह इतर धोरणात्मक उद्योगांसाठी भारताला स्वावलंबी बनवेल, असा ठाम विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली. नागपूरजवळ अंबाझरी इथल्या शस्त्र कारखान्यात आज दहा हजार टनाच्या ॲल्युमिनियम एक्सट्रुजन प्रेस या यंत्राची पायाभरणी सिंह यांच्या हस्ते करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. ही यंत्रणा आधुनिक लढाऊ विमानं, क्षेपणास्त्र आणि प्रगत अंतराळ संशोधन उपक्रमांसाठी वजनाला हलक्या आणि मजबूत धातूची निर्मिती करेल. त्यामुळे महत्त्वाच्या ॲल्युमिनियम एक्सट्रूशन्सच्या आयातीवरचं अवलंबित्व कमी होऊन देशांतर्गत पुरवठा साखळी बळकट व्हायला मदत मिळेल. तसंच, स्वदेशी उत्पादनांच्या माध्यमातून धोरणात्मक क्षेत्रांमधल्या भविष्यातल्या गरजा पूर्ण करण्यासाठी सहाय्यक ठरेल, असं प्रतिपादनही सिंह यांनी यावेळी केलं.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस उपस्थित होते. या महत्त्वाच्या प्रकल्पामुळे ॲल्युमिनियम एक्सट्रूडेड घटकांच्या आयातीवरील देशाचं अवलंबित्व कमी होऊन आत्मनिर्भर भारत संकल्पनेअंतर्गत स्वदेशी उत्पादनाला पाठबळ मिळणार आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**- - - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - - -**

या प्रकल्पामुळे नागपूरसह विदर्भातल्या संरक्षण निर्मिती परिसंस्थेला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी केंद्राच्या सूक्ष्मजीवशास्त्रीय चाचणी प्रयोगशाळेचं उद्घाटन आज मुंबईत केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते झालं. याठिकाणी बहुमजली निवासी संकुलाच्या प्रकल्पाचं भूमिपूजनही त्यांनी केलं. छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सॅटेलाईट केंद्राचं आणि गाझियाबाद इथल्या राष्ट्रीय चाचणी केंद्रातल्या बूट चाचणी सुविधेचं उद्घाटन त्यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं. जागतिक परिस्थिती अस्थिर आणि जागतिक व्यवस्था कमकुवत झालेली असताना, गुणवत्तेची खात्री देऊन भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवण्यात या चाचणी सुविधा महत्त्वाची भूमिका बजावतील, असं प्रतिपादन जोशी यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

शिवसेनेचा आज साठावा वर्धापनदिन आहे. वर्धापन दिनाचा कार्यक्रम शिवसेनेने गोरेगाव नेस्को इथं तर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाने शीव इथल्या षण्मुखानंद सभागृहात आयोजित केला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहा खासदार शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या बातम्या माध्यमात प्रसारित होत आहेत. अशा वेळी कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याची खबरदारी घेण्याची सूचना गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिस उपायुक्तांना दिली आहे.

**<><><><><>**

मुंबईची परिवहन सेवा असलेल्या बेस्टच्या कर्मचाऱ्यांनी आज सकाळपासून बेमुदत संप सुरु केला आहे. मुंबई महानगर पालिकेच्या अर्थसंकल्पात बेस्ट च्या अर्थसंकल्प सामावून घ्यावा. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित आर्थिक लाभ तातडीनं देण्यात यावेत. सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी आदी मागण्यांसाठी बारा कर्मचारी संघटनाच्या वतीनं हा संप पुकारण्यात आला आहे. या संपामुळे मुंबईतल्या २७ बेस्ट डेपोमधून एकही बस बाहेर पडली नाही. या संपामुळे सकाळी आपापल्या कार्यालयाकडे निघालेल्या लाखो प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. बेस्टच्या संपामुळे टॅक्सी, रिक्षा आणि इतर वाहनांचा आधार घ्यावा लागला. बेस्ट संपामुळे मुंबईच्या मेट्रो सेवांवरही मोठा ताण आल्याचं दिसून आलं. बेस्ट उपक्रमाच्या २ हजार ७६६ बसेस पैकी केवळ ३८ बसेस रस्त्यावर धावत असून सहा ठिकाणी कामगारांनी बसेस वर दगडफेक केल्यामुळे बसेसचे नुकसान झाल्याची माहिती बेस्ट प्रशासनाने दिली

आहे. संपाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी बेस्ट मालमत्तेचं नुकसान आणि वाहतुकीत व्यत्यय आणणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

<><><><><>

शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी चार दिवसापासून बुलडाणा इथं सुरु केलेलं अन्यत्याग आंदोलन आज स्थगित केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या सूचनेवरून मंत्री गिरीश महाजन यांनी आज तुपकर यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्याविषयी तात्काळ सकारात्मक विचार करून निर्णय घेऊ, असं आश्वासन दिलं. त्यानंतर महाजन यांच्या हस्ते फळांचा रस घेऊन तुपकर यांनी उपोषण सोडलं. मात्र आपली शेतकऱ्यांसाठीची लढाई यापुढंही सुरू राहील. काही कालावधीसाठी आंदोलन स्थगित केलं आहे, असं तुपकर यांनी सांगितलं.

<><><><><>

बुलढाणा जिल्ह्यात प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांचे शोषण रोखण्यासाठी आणि त्यांच्या सुरक्षेसाठी 'पोश' (POSH) कायद्यांतर्गत तक्रार समित्यांची तातडीने स्थापना करुन केंद्र आणि  राज्य शासनाच्या सर्व महिलाभिमुख योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा, असे  निर्देश राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिले आहेत.

त्या आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या महिला सुरक्षा, कायदे आणि विविध कल्याणकारी योजनांच्या आढावा बैठकीत बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसह विविध वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

नीट यूजी फेरपरीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात एनटीएनं एक अधिकृत व्हॉटसअप संपर्क वाहिनी सुरु केली आहे. परीक्षे संदर्भातली सर्व अधिकृत माहिती ७८२७९८०२८७ या व्हॉटसअप क्रमांकावर उपलब्ध करुन दिली जाणार आहे. आपल्या व्हॉट्सअप वर परीक्षेसंबंधी कोणताही संदेश आल्यास ब्लू व्हेरिफिकेशन टिक आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीचे नाव असल्याची खात्री करुन घ्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे. नीट यूजीची फेरपरीक्षा येत्या रविवारी होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी २१ जूनच्या परीक्षेसाठी आपलं हॉल तिकीट या आधी डाऊनलोड केलं आहे. त्यांना पुन्हा ते डाऊनलोड

करण्याची गरज नसल्याचंही चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. ३ मे रोजीच्या परीक्षेसाठीचं डाऊनलोड केललं हॉल तिकीट या परीक्षेला चालणार नसल्याचंही स्पष्ट करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट होती.

येत्या दोन दिवसात राज्याच्या चारही विभागात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**